# भारतीय लोकशाहीची यशस्वीता ही संविधानाची देणगी : डॉ. अरुण राख

**पाथर्डी । वीरभूमी –**

भारतीय नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये ही भारतीय संविधानामुळेच अबाधित असून जगातील सर्वात मोठ्या व यशस्वी लोकशाहीचा डोलारा भारतीय संविधानामुळेच टिकून आहे. भारतीय संविधान आणि घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ भारतीय संविधान दिन साजरा केला जातो. पश्चिमात्य संस्कृतीच्या युगात देशातील तरुणांमध्ये संविधानाची मूल्य रुजविणे हा संविधान दिन साजरा करण्यामागचा एकमेव उद्देश आहे. असे प्रतिपादन बाबुजी आव्हाड महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अरुण राख यांनी केले.



छाया । अनिल खाटेर

ते महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भारतीय संविधानाचे महत्व या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे होते. तर व्यासपीठावर प्रा. प्रदीप वारुळकर होते.

कार्यक्रमाची सुरुवात संविधानपूजनाने करण्यात आली. यानंतर संविधान उद्देशिकेचे विद्यार्थ्यांनी वाचन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. मन्सूर शेख तर आभार प्रा. सुनील कचरे यांनी मानले. यावेळी वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सांप्रदायीक सद्भावना तिकिटाचे वाटप करण्यात आले.

यावेळी डॉ. अशोक कानडे, ग्रंथपाल प्रा. किरण गुलदगड, डॉ. अजयकुमार पालवे, प्रा. दत्तप्रसाद पालवे, डॉ. प्रशांत साळवे, प्रा. वैशाली आहेर, डॉ. अशोक डोळस, प्रा. आनंद घोंगडे, प्रा. ब्रम्हानंद दराडे आदी प्राध्यापक उपस्थित होते.

# लोकशाहीची यशस्विता ही संविधानाची देणगी : डॉ. राख

## आव्हाड महाविद्यालयात संविधान दिन

पाथर्डी (तालुका प्रतिनिधी)– जगातील सर्वात मोठ्या व यशस्वी लोकशाहीचा डोलारा भारतीय संविधानामुळेच टिकून आहे.पाश्चिमात्य संस्कृतीच्या युगात देशातील तरुणांमध्ये संविधानाची मूल्य रुजविणे हा संविधान दिन साजरा करण्यामागचा एकमेव उद्देश आहे, असे प्रतिपादन राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.अरुण राख यांनी केले.

शहरातील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भारतीय संविधानाचे महत्व या विषयावर ते बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.पी.ढाकणे होते तर व्यासपीठावर प्रा.प्रदीप वाकळकर होते.कार्यक्रमाची सुरुवात संविधान पूजन करून करण्यात आली.

यावेळी संविधान उद्देशिकेचे विद्यार्थ्यांनी वाचन केले. यावेळी वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सांप्रदायीक सद्‌भावना तिकिटाचे वाटप करण्यात आले. डॉ.अशोक कानडे, ग्रंथपाल प्रा.किरण गुलदगड, डॉ.अजयकुमार पालवे, प्रा. दत्तप्रसाद पालवे, डॉ. प्रशांत साळवे, प्रा. वैशाली आहेर, डॉ. अशोक डोळस, प्रा.आनंद घोंगडे, प्रा.ब्रम्हानंद दराडे आदी प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा.मन्सूर शेख तर आभार प्रा.सुनील कचरे यांनी मानले.

7.1.9

पुढारी

# संविधानाची मूल्ये रुजावीत : डॉ. राख

**पाथर्डी शहर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय नागरिकांचे अधिकार व कर्तव्ये ही भारतीय संविधानामुळेच अबाधित असून, जगातील सर्वांत मोठ्या व यशस्वी लोकशाहीचा डोलारा भारतीय संविधानामुळेच टिकून आहे. भारतीय संविधान आणि घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सन्मानार्थ भारतीय संविधान दिन साजरा केला जातो. पश्चिमात्य संस्कृतीच्या युगात देशातील तरुणांमध्ये संविधानाची मूल्य रुजविणे हा संविधान दिन साजरा करण्यामागचा एकमेव उद्देश आहे, असे प्रतिपादन बाबूजी आव्हाड महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अरुण राख यांनी केले.



**पाथर्डी : बाबूजी आव्हाड महाविद्यालयात संविधान दिन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. अरुण राख.**

ते महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भारतीय संविधानाचे महत्त्व या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे होते. व्यासपीठावर प्रा. प्रदीप वारुळकर होते. कार्यक्रमाची सुरुवात संविधानपूजन वाचनाने करण्यात आली. यानंतर संविधान उद्देशिकेचे विद्यार्थ्यांनी वाचन केले. सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. मन्सूर शेख, तर आभार प्रा. सुनील कचरे यांनी मानले. यावेळी वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सांप्रदायिक सद्‌भावना तिकिटाचे वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. अशोक कानडे, ग्रंथपाल प्रा. किरण गुलदगड, डॉ. अजयकुमार पालवे, प्रा. दत्तप्रसाद पालवे, डॉ. प्रशांत साळवे, प्रा. वैशाली आहेर, डॉ. अशोक डोळस, प्रा. आनंद घोंगडे, प्रा. ब्रह्मनंद दराडे आदी उपस्थित होते.

My Ahmednagar Edition
Nov 27, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in